<u>पोलीस कोठडीतील मृत्यु संदर्भात करावयाची कार्यवाही.</u>

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : सीआरटी-०६१४/६८४/प्र.क्र.०२ /पोल-१४**
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २० फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा :</u> १.पोलीस महानिरिक्षक, (मा.ह.आ) पोलीस महासंचालक कार्यालय यांचे परिपत्रक क्रमांक पोमसं/४२-अ/मा.ह.आ./परिपत्रक/२००४, दिनांक २७.०१.२००४

२. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक अपोमसं/गुअवि/वाचक/परिपत्रक/पोकोमृ/उपाययोजना १०१/२०१२ दिनांक २३.०४.२०१२

३. शासन परिपत्रक, गृह विभाग,क्रमांक सीआरटी-०६१४/६८४/प्र.क्र.०२/पोल-१४, दिनांक १० जानेवारी, २०१७

४. पोलीस महासंचालक यांचे पत्र क्रमांक पोमसं/४२-अ/मा.ह.कक्ष/ पो.को.मृ./१९/२०१७ दिनांक १०.११.२०१७

**<u>प्रस्तावना:</u>**

राज्यामध्ये पोलीस कोठडीत होणाऱ्या मृत्यूच्या घटना चिंताजनक विषय असून याबाबत राष्ट्रीय मानव अधिकार आयोगामार्फत दखल घेण्यात येते. पोलीस कोठडीतील मृत्युप्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय/मा. उच्च न्यायालयात दाखल याचिकेंच्या (विशेषत: डी.के.बसु न्यायालयीन प्रकरण) अनुषंगाने मा. न्यायालयाने पोलीस कोठडीतील मृत्यु टाळण्यासाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित करुन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आदेश पारित केले आहेत. एखादया गुन्हयामध्ये गुन्हा कबुल करण्यासाठी अथवा गुन्हा सिध्द करण्यासाठी पोलीस यंत्रणेमार्फत चौकशीकरीता ताब्यात घेतलेल्या व्यक्तींचा शारिरीक व मानसिक छळ केला जातो. त्यामुळे प्रसंगी पोलीस कोठडीत मृत्युच्या घटना घडतात. सदरची कृती अमानवीय असून कायदयाचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे पोलीस प्रशासन तसेच राज्य शासनाची प्रतिमा जनमानसांत मलीन होत असते. पोलीस कोठडीत अटक आरोपी व्यक्तींचे होणारे मृत्यु टाळण्यासाठी संदर्भाधीन पोलीस महासंचालक, अपर पोलीस महासंचालक आणि शासन परिपत्रकान्वये सर्व पोलीस घटक प्रमुखांना वेळोवेळी सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. पोलीस कोठडीत अटक आरोपी व्यक्तीचा मृत्यू होण्याची घटना सांगली येथील प्रकरणातून पुन: निदर्शनास आली असल्याने पोलीस घटक प्रमुख या विषयाकडे गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे शासनाचे निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने सविस्तर सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक</u> :-**

राज्यातील पोलीस कोठडीतील मृत्यु टाळण्यासाठी संदर्भिय क्रमांक १ ते ४ येथील पोलीस महासंचालक, अपर पोलीस महासंचालक तसेच शासन परिपत्रकान्वये यापूर्वी दिलेल्या सूचना या परिपत्रकाद्वारे पुन्हा एकदा सर्व पोलीस घटक प्रमुखांच्या निदर्शनास आणण्यात येत असून सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

१) एखादया गुन्हयातील आरोपीतास अटक करतांना त्याचा अटक पंचनामा तयार करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्याने आरोपीताचे बाहय अंग/शरीर नीट तपासून/पारखून घ्यावे व आरोपीताच्या शरीरावर दिसणाऱ्या सर्व जखमांचा तपशील अटक पंचनाम्यात काटेकोरपणे नमुद करावा.

२) आरोपीतास अटक करतांना त्याची अंग झडती घेण्यात यावी. आरोपीस पोलीस कोठडीत ठेवण्यापूर्वी आणि त्यास कोर्टात हजर करुन किंवा तपासाकरीता बाहेर नेल्यानंतर पुन्हा पोलीस कोठडीत ठेवण्यापूर्वी आरोपीताची/कैदयाची कसून झडती घेतल्याशिवाय त्यास पोलीस कोठडीत ठेवण्यात येऊ नये. झडतीदरम्यान त्याच्याकडे मारक हत्यार, विषारी पदार्थ, दोरी व तत्सम वस्तु, ब्लेड, काडीपेटी, चाकू इत्यादी प्रकारच्या अन्य वस्तु आढळल्यास अशा वस्तु आरोपीतास पोलीस कोठडीत ठेवण्यापूर्वीच काढून घेण्यात याव्यात.

३) अटक केलेल्या व पोलीस कोठडी देण्यांत आलेल्या आरोपीस दुखापत झाल्याचे आढळल्यास त्यास जवळच्या रुग्णालयात नेऊन आवश्यक ती वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यांत यावी व आरोपीच्या दुखापतीबाबत रुग्णालयातील वैद्यकीय अहवाल रुग्णालयाच्या तसेच पोलीसांच्या अभिलेखावर जतन करण्यांत यावा.

४) आरोपी जोपर्यंत पोलीस कोठडीत राहील तोपर्यंत दर ४८ तासांनी त्या आरोपीची वैद्यकीय तपासणी करुन त्याची नोंद संबंधित नोंदवहीत न चुकता घ्यावी.

५) पोलीस ठाण्यातील पोलीस कोठडीच्या बाहेर CCTV यंत्रणा बसविण्यात यावी व त्यामधील अभिलेख पुढील तीन महिन्यांच्या कालावधीसाठी जतन करण्यात यावा.

६) पोलीस कोठडीमधील आरोपीच्या माहिती भेटीचा वृतान्त नोंद करुन ठेवण्यात यावा. पोलीस ठाण्यातील पोलीस कोठडीमधील आरोपींसंदर्भात पोलीस ठाणे अंमलदाराने अद्ययावत नोंदी ठेवाव्यात.

७) आरोपीस चौकशीसाठी चौकशी खोलीमध्ये नेताना तपासी अधिका-याने ठाणे अंमलदार/ पोलीस ठाणे प्रमुख (S.H.O.) यांना तसे कळवावे व तशी नोंद पोलीस ठाणे दैनंदिनीमध्ये व लॉकअप रजिष्टरमध्ये घेण्यात यावी.

८) चौकशी कामी/तपास कामी पोलीस कोठडीतील आरोपीतास बाहेर घेऊन जाण्यात आले तर त्याबाबतची सविस्तर नोंद पोलीस ठाणे दैनंदिनीमध्ये (G.D.) घेण्यात यावी. त्याप्रमाणे सदरची बाब उप विभागीय पोलीस अधिकारी (S.D.P.O) यांच्याकडे पाठविण्यात येणा-या दैनिक अहवालामध्ये सुध्दा नमुद करण्यात यावी.

९) वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि उप विभागीय पोलीस अधिकारी यांनी पोलीस ठाण्यास भेट देते वेळी पोलीस ठाण्यातील पोलीस कोठडीस भेट द्यावी.

१०) एखाद्या गुन्हयातील दोषसिध्दीसाठी अथवा गुन्हा कबुलीकरीता चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या आरोपीस मारहाण करणे, त्याचा शारिरीक व मानसिक छळ करणे या बाबी अयोग्य असून कायदयाचे विरोधात आहेत. चौकशी करतांना संबंधित अधिकाऱ्याने चौकशीचे तंत्र अवगत करुन, तसेच स्वत:च्या तपासाच्या कौशल्याचा वापर करावा. तसेच गुन्हयाचा तपास करतांना उपलब्ध आधुनिक तंत्राचा सुध्दा वापर करण्यात यावा..

११) पोलीस कोठडीच्या पहाऱ्यावर असणाऱ्या अंमलदाराने कटाक्षाने पहारा दयावा. पोलीस कोठडीच्या पहाऱ्यावरील अंमलदार तसेच रात्रपाळीवरील सेंट्री डयुटी अंमलदार यांनी पोलीस कोठडीतील आरोपींच्या हालचालीवर नियमितपणे व कटाक्षाने नजर ठेवावी जेणेकरुन पोलीस कोठडीतील आरोपीस आत्महत्या करण्याची संधी मिळणार नाही.

१२) पोलीस कोठडीतील मृत्यु या विषयाबाबत पोलीसांची संवेदनक्षमता विकसित करण्यासाठी किमान ३/४ वर्षाच्या अंतराने पोलीसांना या विषयाबाबत प्रशिक्षण देण्यांत यावे.

१३) गुन्हयातील आरोपीस गुन्हयासंदर्भात ताब्यात घेणे, गुन्हयासंबंधी त्याच्याकडे चौकशी करणे, एखादया गुन्हयात अटक केल्यास त्याबाबत त्याच्या जवळचे नातेवाईक किंवा मित्र इत्यादींना माहिती देणे, अटक केल्यानंतर २४ तासांचे आंत जवळच्या न्यायदंडाधिकाऱ्यासमोर हजर करणे, पोलीस रिमांड घेणे इत्यादी बाबीविषयी भारतीय फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे. सदर तरतुदींचे पालन करण्याच्या दृष्टीने पोलीस घटकांमध्ये पोलीसांसाठी नियमितपणे कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे.

१४) पोलीस कोठडीतील आरोपीची सुरक्षा, आरोग्य व जिविताची जबाबदारी त्यास अटक करणारा अधिकारी, तपासी अधिकारी, ठाणे अंमलदार (S.H.O.) यांचेवर राहील याची नोंद घ्यावी.

सर्व पोलीस आयुक्त/जिल्हा पोलीस अधिक्षकानी सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील सर्व पोलीस ठाणे अंमलदार व शाखा प्रमुखांच्या त्वरित निदर्शनास आणावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८०२२६१६२५५६८९२९ असा आहे. सदर परिपत्रक डिजिटल साक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Jaysing L.Pawara

Digitally signed by Jaysing L.Pawara
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f11b49d608f53d77adcefe811502 5d93bfe9dbee3f61b1c150d64818cb09f90c , cn=Jaysing L.Pawara
Date: 2018.02.26 16:27:59 +05'30'

**( ज.ल.पावरा )**
सह सचिव, गृह विभाग

**प्रत**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई
२) महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,महाराष्ट्र राज्य,मुंबई
३) सर्व पोलीस आयुक्त (शहरे/लोहमार्ग)
४) अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग,महाराष्ट्र राज्य,पुणे
५) अपर पोलीस महासंचालक,विशेष कृती/प्रशिक्षण/लोहमार्ग/वाहतुक/दविप/महाराष्ट्र राज्य,मुंबई
६) विशेष पोलीस महानिरिक्षक,नागरी हक्क संरक्षण/फोर्स वन,महाराष्ट्र राज्य,मुंबई
७) सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरिक्षक
८) विशेष पोलीस महानिरिक्षक,नक्षल विरोधी अभियान,नागपूर,
९) पोलीस उप महानिरिक्षक,गडचिरोली परिक्षेत्र,कॅम्प नागपूर
१०) सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हे/लोहमार्ग)

**प्रत माहितीसाठी**

१) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
२) मा. राज्यमंत्री (शहरे/ग्रामीण) यांचे स्वीय सहायक
३) अ.मु.स. (गृह) यांचे स्वीय सहायक.